# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी केलेली गुरुसेवा व त्यांचे शिष्यत्व

## प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणातील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. डॉ. आठवले यांनी केलेली आदर्श गुरुसेवा १५**

१ अ. डॉ. आठवले यांनी गुरूंच्या आश्रमात जाऊन केलेली सेवा १५

१ आ. डॉ. आठवले यांनी त्यांच्या घरी गुरूंचे वास्तव्य असतांना केलेली गुरुसेवा १७

१ इ. डॉ. आठवले यांनी गुरूंच्या सगुण सेवेचे अनुभवलेले महत्त्व आणि त्या सेवेतील कठीणता १८

१ उ. डॉ. आठवले यांनी साधकांकडून गुरुसेवा करवून घेणे २१

१ ए. डॉ. आठवले यांनी गुरूंची शिकवण सर्वांपर्यंत पोचवणे २३

१ ओ. प.पू. भक्तराज महाराज यांच्या गुरुपौर्णिमांचे आयोजन २७

१ औ. प.पू. भक्तराज महाराज यांच्या अमृत महोत्सवाचे आयोजन २८

**प्रकरण २. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा गुरूंप्रतीचा भाव ३७**

२ अ. ‘प.पू. बाबा ईश्वर आहेत’, असा भाव असणे ३७

२ इ. ‘सनातनच्या आश्रमात प.पू. बाबांच्या कृपेने चैतन्य आणि सात्त्विकता जाणवते’, असे डॉक्टरांनी सांगणे ३८

२ ऊ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी ‘स्वतःचा सन्मान हा गुरूंचाच सन्मान आहे’, असे समजणे ३८

**प्रकरण ३. परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे शिष्यत्व ४०**

३ अ. गुरूंचे तंतोतंत आज्ञापालन करणे ४०

३ ई. प.पू. भक्तराज महाराजांचा डॉक्टरांवरील विश्वास ४३

३ उ. गुरूंना अपेक्षेनुसार अर्पण देता न आल्याने खंत वाटणे ४३

३ ए. प.पू. डॉक्टरांच्या सत्संगाचा इतरांना लाभ होणे आणि तरीही त्यांचा अहं न वाढणे ४४

३ ओ. 'भविष्यात गोवा येथे 'विश्वदीप होईल', या गुरुवाणीला सत्यात उतरवणारे परात्पर गुरु डॉक्टर ! ४५

३ औ. गुरुपत्नी आश्रमात आल्यावर त्यांच्या चरणी मस्तक ठेवून नमस्कार करणे ४५

३ ख. 'स्वतःच्या पादुका या गुरूंच्याच आहेत', असा भाव असणे ४७

३ घ. 'परात्पर गुरु' या पदावर असूनही सतत शिष्यभावात रहाणे ४८

**प्रकरण ४. गुरूंनी डॉ. आठवले यांची घेतलेली काळजी ५१**

४ इ. गुरूंनी शिष्याच्या कर्जाचे दायित्व स्वीकारणे ५२

४ ए. प.पू. बाबांचे डॉ. आठवले यांच्या रक्षणाविषयीचे बोल ! ५४

**प्रकरण ५. डॉ. आठवले यांची गुरूंचे भक्त आणि साधक यांच्यावरील प्रीती ५६**

५ अ. भक्तांच्या सोयीसाठी स्वतः गर्दीत झोपणे ५६

५ उ. सनातनच्या आश्रमात येणाऱ्या भक्तांचे आदरातिथ्य करणे ५७

**प्रकरण ६. डॉ. आठवले यांची गुरूंशी असलेली एकरूपता ५८**

६ अ. 'जे माझे आहे, ते तुमचे आहे अन् ते वापरायचा तुमचा अधिकारच आहे', असे प.पू. भक्तराज महाराज यांनी सांगणे ५८

६ आ. डॉ. आठवले यांना 'गुरूंना काय हवे आहे ?', याची आतून जाणीव होणे ५८

६ इ. प.पू. बाबांनी त्यांच्या देहत्यागाच्या दिवशी 'डॉक्टर आणि मी एकच आहोत', असे साधिकेला स्वप्नात सांगणे ५८

**प्रकरण ७. गुरूंची 'भजन, भ्रमण आणि भंडारा', ही त्रिसूत्री कृतीत आणणारे परात्पर गुरु डॉ. आठवले ! ६०**

# विषयसूचीतील क्रमांक ३

## ग्रंथाचे मनोगत

‘शिष्य डॉ. जयंत आठवले यांचे गुरु प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) नेहमी सांगत, ‘संतांना लुटायच्या दोन गोष्टी आहेत - नाम आणि सेवा !’ डॉ. आठवले यांनी गुरूंकडून या दोन गोष्टींची भरपूर लयलूट केली; कारण गुरूंच्या सहवासात त्यांचा अखंड नामजप होत असे आणि ‘नेमले या चित्ता तुझ्या सेवे नाथा । नुरे कार्य आता आणिक ते ।।’, ही त्यांची वृत्तीच बनली होती ! त्यांनी गुरुचरणी तन-मन-धन अर्पून परिपूर्ण सेवा केली; म्हणूनच गुरूंनीही त्यांना म्हटले, ‘डॉक्टर, मी तुम्हाला ज्ञान, भक्ती आणि वैराग्य दिले !’

डॉ. आठवले गुरूंकडे गेल्यावर तेथील शौचालयांची स्वच्छता करण्यापासून गुरूंचे पथ्य-पाणी सांभाळण्यापर्यंतच्या सर्व प्रकारच्या सेवा तहान-भूक विसरून करायचे. ते गुरु सांगतील ते तात्काळ करायचेच; पण ‘जाणूनी श्री गुरूंचे मनोगत’, या भावानेही अनेक सेवा स्वतःहून यथायोग्य करायचे. यासाठी प.पू  बाबांना ते नेहमी जवळ लागायचे. गुरुसेवा करतांना त्यांच्यात असलेली गुरुसेवेची तळमळ, भाव, प्रीती, नेतृत्व, व्यापकता अशा विविध गुणांचे दर्शन या ग्रंथातून होते. त्यांनी केवळ स्वतःच गुरुसेवा केली नाही, तर साधकांनाही सेवेची संधी दिली; इतकेच नव्हे, तर त्यांनाही सेवेच्या माध्यमातून घडवले.

शिष्य जेव्हा आपले तन-मन-धन गुरूंना अर्पण करतो, तेव्हा त्याच्या मालकीची प्रत्येक वस्तू, इतकेच नव्हे, तर त्याच्या मनातील प्रत्येक विचारही गुरूंचाच असतो. डॉक्टरांचीही स्थिती अशी असायची. त्यांच्या मनातील प्रत्येक विचार हा प.पू. बाबांचाच असल्याची प्रचीती त्यांना येत असे. यावरून ‘डॉक्टरांचे शिष्यत्व किती उच्च कोटीचे होते’, हे लक्षात

येते. त्यांच्या शिष्यत्वाच्या विविध छटा दर्शवणारा हा ग्रंथ साधकांना ‘आदर्श शिष्य’ बनण्यासाठी लाखमोलाचा आहे.

एक आदर्श शिष्यच गुरूंच्या कार्याचे दायित्व परिपूर्णरित्या सांभाळू शकतो. प.पू. बाबांचे गुरुपौर्णिमा महोत्सव, अमृत महोत्सव यांसारख्या मोठमोठ्या सेवांचे दायित्व डॉक्टर एवढे उत्तम सांभाळायचे की, त्या सर्व सेवा अगदी चोख होत असत. गुरूंची शिकवण समष्टीपर्यंत पोचवण्याची विलक्षण तळमळ आणि त्यासाठी कोणतेही कष्ट घेण्याची डॉक्टरांची जिद्द यातून लक्षात येत असे. त्यामुळे प.पू. बाबा डॉक्टरांवर पुष्कळ प्रसन्न होत असत, त्यांचे जाहीररित्या कौतुक करत असत आणि त्यांना कार्यासाठी आशीर्वादही देत असत. गुरूंच्या आशीर्वादामुळे डॉक्टरांची अल्पावधीतच पुष्कळ आध्यात्मिक उन्नती झाली आणि त्यांनी आरंभलेल्या अध्यात्मप्रसारकार्याचा वेलू आज जणू गगनाला भिडत आहे ! अशा शिष्यरूपातील डॉ. आठवले यांचा हा साधनाप्रवास सर्वच साधकांसाठी साधनापथावरील दीपस्तंभच आहे.

आज डॉक्टरांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी असतांनाही ते म्हणतात, ‘मला तर प.पू. बाबांचे शिष्य होऊन त्यांची सेवा करण्यासाठी पुनःपुन्हा जन्म घ्यायला आवडेल !’ ‘अशा आदर्श गुरुसेवक आणि उत्तम शिष्य यांचे दर्शन घडवणाऱ्या या ग्रंथाच्या अध्ययनाने आपल्यातही सेवाभाव आणि शिष्यभाव लवकर निर्माण होऊन आपली शीघ्र आध्यात्मिक उन्नती होवो’, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना !’ – **(पू.) श्री. संदीप आळशी (२.९.२०२२)**

(ग्रंथमालिका ‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे चरित्र’ आणि उपमालिका ‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा साधनाप्रवास’ यांची अधिक ओळख ‘साधनाप्रवास : खंड १’ यामध्ये दिली आहे.) F (DrSP-GS + SStSA-L)